क्रमांक - ऑनलाईनअर्ज/आधार क्रमांक/२०१६/तेवीस दिनांक - ४ मे, २०१८

# - घोषणा -

## ऑनलाईन अर्ज प्रणाली - प्रोफाईलमध्ये आधार तपशिल दिनांक 31/05/2018 पूर्वी न नोंदविल्यास प्रोफाईल Deactivate करण्यासंदर्भात

आयोगाच्या परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांची ओळख पटविण्याकरीता उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये 'आधार' कार्ड विषयक तपशील नोंदविण्याची पद्धती व सुविधा मार्च, 2017 पासून लागु करण्यात आली आहे. त्यानुसार, नेहमीप्रमाणे उमेदवारांनी वैयक्तिक तपशिलामध्ये नोंदवावयाच्या इतर माहिती व्यतिरिक्त, त्यांचे आधार कार्ड मध्ये नोंदविल्याप्रमाणे नाव व आधार क्रमांक वेगळयाने नोंदविणे बंधनकारक केलेले आहे. हे शक्य होण्यासाठी एप्रिल, 2016 मध्येच आयोगाने घोषणा करून उमेदवारांनी आधार कार्ड काढले नसल्यास ते काढण्यासाठी सुचना देवून पुरेसा अवधी दिला होता.

२. यास्तव ओळख पटविण्यातील संभाव्य गैरप्रकार रोखण्यासाठी असा निर्णय घेण्यात आला आहे की, ज्या उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये आधार क्रमांक अथवा आधार नोंदणी क्रमांक (Aadhar Enrolment Number) समाविष्ट करण्यात आलेला नाही अशा सर्व प्रोफाईलव्दारे अर्ज सादर करण्याची सुविधा दिनांक १ जून, २०१८ पासून निष्क्रिय (Deactivate) करण्यात येईल. प्रोफाईल निष्क्रिय केल्यानंतर संबंधित उमेदवार त्या प्रोफाईलमध्ये लॉगइन करुन, त्या प्रोफाईल मधील माहिती पाहू शकेल, परंतु सदर प्रोफाईलवरुन भविष्यात कोणतेही अर्ज करु शकणार नाही. आधार माहिती नमूद न केलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमधील आधार विषयक माहिती अद्ययावत करण्यासंदर्भात आयोगामार्फत SMS द्वारे कळविण्यात येत आहेत. तसेच ज्या उमेदवारांनी आधार कार्ड प्राप्त केलेले आहे त्यांनी त्यांचा आधार क्रमांक प्रोफाईलमध्ये नमुद करणे बंधनकारक राहील.

३. आयोगाच्या विविध परीक्षांना बसलेल्या व बसु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी, वरील बाबीची नोंद घ्यावी. ही गैरसोय टाळण्यासाठी ज्या उमेदवारांनी अद्याप आधार कार्ड मिळविले नसेल, त्यांनी तातडीने ते प्राप्त करून घेणे, व किमान आधार नोंदणी क्रमांक तरी त्वरित मिळवावा व त्याचा तपशील प्रोफाईल मध्ये विहित ठिकाणी अचूकपणे नोंदवावा. आधार कार्ड मिळण्यासाठीच्या केद्रांची यादी https://uidai.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. उपरोक्त कार्यवाही करताना अडचणी आल्यास उमेदवाराने ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील मे.महाऑनलाईन लिमिटेड यांच्या **mpsc.support@mahaonline.gov.in** या ईमेल आयडीवर अथवा **suvidha.mahaonline.gov.in** येथे आपले निवेदन प्रोफाईलमध्ये नोदणी केलेल्या ईमेलवरुन पाठवावे. तसेच ऑनलाईन अर्जप्रणालीच्या **Help Line** क्रमांक ०२२-६१३१६४०२ वर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत संपर्क साधावा.

दिनांक : ४ मे, २०१८
ठिकाण : मुंबई

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**